दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

नाही जमणार असा विचार करण्याऐवजी करून बघू म्हणत केलेली सुरुवात, यशस्वी होण्याचं पहिलं पाऊल आहे.


खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here


वर्ष : ०५ | अंक : १५९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२१ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींसाठी खुशखबर !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला राज्यभरात प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला आहे. राज्यातील जवळपास दोन कोटींपेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. राज्य सरकारकडून अडीच लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील महिलांना लाडकी बहीण योजना अंतर्गत आर्थिक मदत केली जाते. या योजने अंतर्गत महिलांना दर महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत केली जाते.

या योजनेसाठी काही निकष ठेवण्यात आली आहे. तसेच आता निकषांची अंमलबजावणी कठोरपणे केली जात आहे. राज्य सरकारकडून लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्याचं आवाहन करण्यात आलं होतं. या ई-केवायसीसाठी तारीखही वाढवण्यात आली होती. आता ई-केवायसीची मुदत संपली आहे. दरम्यान, याच ई-केवायसीबद्दल महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.




**आदिती तटकरे नेमकं काय म्हणाल्या आहेत?**

महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ट्विट करत महत्त्वाची माहिती दिली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेबाबत महत्वाची सूचना! महाराष्ट्रातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी, त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लाभार्थ्यांना दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी पर्यंत e-KYC करण्याची मुदत देण्यात आली होती. तथापि, काही कारणास्तव e-KYC करताना चुकीचा पर्याय निवडण्याची बाब निदर्शनास आली आहे. म्हणूनच, योजनेच्या निकषांनुसार या लाभार्थी महिलांची क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

**काही जणांची ई-केवायसीची मुदत वाढवण्याची मागणी**

आदिती तटकरे यांनी फेसबुवरही याबाबतची माहिती दिली आहे. त्यांच्या पोस्टवर अनेकांकडून प्रतिक्रिया दिली जात आहे. अनेकांनी ई-केवायसीची मुदत आणखी वाढवण्याची विनंती केली आहे.

काही महिलांची ई-केवायसी करताना ओटीपी आला नाही त्यामुळे ई-केवायसी पूर्ण होऊ शकली नाही, अशा महिलांसाठी ई-केवायसीची तारीख वाढवण्यात यावी, अशी विनंती एका युजरने आदिती तटकरे यांच्या फेसबुक पोस्टवर केली आहे. आता या कमेंटचा विचार करुन आदिती तटकरे खरंच अशा महिलांसाठी काही निर्णय घेतात का? ज्या लाडक्या बहिणींची ई-केवायसी राहिली आहे त्यांच्यासाठी मुदत वाढवण्याचा निर्णय घेतात का? ते पाहणं आता महत्त्वाची आहे.

# बारामतीत पंचविशीतल्या तरुणीच्या अमानुष हत्येनं खळबळ !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, बारामती :** बारामतीच्या सुपा परिसरातून एक सुन्न करणारी बातमी समोर आली आहे. एका २५ ते २७ वर्षीय तरुण महिलेची अमानुष हत्या करून तिचा मृतदेह रस्त्याच्या कडेला फेकून दिल्याची घटना उघडकीस आली असून, या घटनेने संपूर्ण पुणे जिल्हा हादरला आहे. गुन्हेगारीच्या या भीषण कृत्याने परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे.

**पहाटेचा थरार अन् रक्ताने माखलेला मृतदेह**

बारामती तालुक्यातील सुपे गावाजवळील काळखरेवाडी हद्दीतील खैरेपडळ परिसरात आज पहाटेच्या सुमारास ग्रामस्थांना एक धक्कादायक दृश्य दिसले. रस्त्याच्या कडेला एका तरुण महिलेचा रक्ताने माखलेला आणि विवस्त्र अवस्थेतील मृतदेह पडलेला होता. हे दृश्य पाहताच परिसरात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच सुपा पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी धावून आले. प्राथमिक पाहणीत महिलेवर धारदार शस्त्राने अनेक वार करून तिची निर्घृण हत्या केल्याचे समोर आले आहे.

**पुरावे मिटवण्याचा प्रयत्न?**

नराधमाने हत्या केल्यानंतर ओळख पटू नये किंवा पुरावे नष्ट व्हावेत या उद्देशाने मृतदेह या निर्जन ठिकाणी फेकून दिल्याचे संशय व्यक्त केला जात आहे. महिलेच्या अंगावर झालेल्या जखमा पाहता, हा हल्ला अत्यंत अमानुष होता हे स्पष्ट होते. मृतदेहाच्या अवस्थेवरून संशयाची सुई अनेक बाजूंनी फिरत आहे. ही हत्या नेमकी कुठे झाली आणि इथे फक्त मृतदेह टाकला का, याचा शोध आता पोलीस घेत आहेत.

**पाच पथके तैनात; तपासाची चक्रे वेगवान**

घटनेचे गांभीर्य ओळखून अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी तातडीने घटनास्थळाची पाहणी केली. तपासासाठी फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि श्वानपथकाला पाचारण करण्यात आले आहे. आरोपीच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांची पाच पथके विविध दिशांना रवाना करण्यात आली आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा माग काढण्यास सुरुवात केली आहे.

सुपा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज नवसरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास युद्धपातळीवर सुरू आहे. या निर्घृण खुनामागे नेमके काय कारण आहे? प्रेमप्रकरण, जुना वाद की आणखी काही? या प्रश्नांचे उत्तर आता पोलीस तपासातच समोर येईल.

# मुक्रमाबाद येथील रास्ता रोकोला व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवुन दिला पाठींबा

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२०, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील लेंडी धरणातील बुडीत क्षेत्रात मुळ कुटुंब व वाढीव कुटुंबाचा स्वेच्छा पुनर्वसन मावेजा मिळण्या सह अन्य प्रमुख मागण्या घेऊन धरणग्रस्तानी मंगळवार दि.२० रोजी मुक्रमाबाद येथील राष्ट्रीय महामार्गावरील बसस्थानकावर आल ईंडिया पँथर संघटनेच्या वतीने रास्तारोको आंदोलन केले. या आंदोलनास शहरातील सर्वच व्यापाऱ्यांनी आपली दुकाने, हाटेल्स पान ठेले कडकडीत बंद ठेवून पाठिंबा दिला.यावेळी प्रवासी वाहतूक खोळंबल्यामुळे कांही काळ वाहणाची व प्रवाशांची तारांबळ उडाली होती. ३० ते ३५ गावातील प्रवाशी व शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना देखील वाहतुकीचा फटका बसला.काही कालांतराने पोलीस प्रशासनांच्या वतीने वाहतुक सुरु केल्यामुळे प्रवाशांनी आनंद व्यक्त केला.



मुखेड तालुक्यातील गोणेगाव येथे बऱ्याच कालावधीनंतर अंतरराज्य तेलंगणा व महाराष्ट्र शासनाने लेंडी प्रकल्पातील संपादीत धरणग्रस्तांना वाऱ्यावर सोडून अखेर प्रशासनाने दबाव तंत्राचा वापर करून लेंडी धरणाचे महत्वाचे गळभरणीसह अनेक महत्त्वाचे काम पूर्ण केल्याने २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीने धरण क्षमतेने भरल्याने यात अंदाजे सहा गावे पूर्ण पाण्यात बुडाली होती यात जीवितहानी सुद्धा झाली होती. यात जीवनावश्यक वस्तू सह पाळीव प्राण्याचे प्रचंड. नुकसान झाल्याने त्यांचे कुटुंब रस्त्यावर आले होते.

लेंडी धरणाचे काम पूर्णतत्वाकडे गेले असताना लेंडी धरणातील संपादित गावातील काही गावे वगळता आणखी अनेक कांही शेतीचे सानुग्रह मावेजा मिळाले नाही.यात फक्त लग्न न झाल्यामुळे २१ वर्षाच्या वाढीव तरुणांना स्वेच्छा पुनर्वसन मावेजापासून वंचित ठेवण्यात आले आहे.त्यामुळे यातील ही जाचक आठ शिथिल करून मावेजाचा लाभ देण्यासह मुळ कुटुंबाना कलम (७२/२) नुसार नोटीसा देऊन तब्बल तीन वर्ष पूर्ण झाले आहे तरी यांना मावेजा देण्यात आला नाही.

मुक्रमाबाद येथील वाढीव कुंटूबाना मावेजा देण्यात यावा बाधीत गावातील घरातील विहिर, तळघरचे सर्वे करून त्यांना मावेजा देण्यासह अन्य प्रमुख मागण्या घेऊन धरणग्रस्तानी मुक्रमाबाद बस्थानकावर बेमुदत आंद़ोलन सुरु केले आहे. शासनाचे प्रतिनिधी म्हणून मुखेड येथील नायब तहसीलदार मामीलवाड यांनी आंदोलन माघार घ्यावी अशी विनंती केली होती पण आंदोलनकानी नकार दिला कांहीं तासानंतर मा.उपविभागीय अधिकारी यांनी भ्रमनध्वनी वरून संवाद साधून त्यांच्या सुचनेनुसार दि.२७-०१-२०२६ रोजी तलाठी कार्यालयात सर्व प्रलंबित अर्ज पंचनामा करून दाखले मंजुरी साठी पुढील कार्यालयात पाठवण्यात येईल असे आश्वासन मा.मंडळअधिकारी पांचाळ, तलाठी केतेश्वर कोंडेवाड यांच्याकडून आंदोलकांना निवेदनात दिले. या निवेदनाद्वारे आंदोलन माघार घेतली.

यावेळी आल इंडिया पॅंथर सेना तालुका उपाध्यक्ष जगदीश कांबळे, आरपीआयचे माणिक गायकवाड, प्रशांत मेटकर, माधवराव देशमुख,जैनुदीन पटेल, शेतकरी नेते शिवशंकर पाटील, अशोक कांबळे, बालाजी गायकवाड, सिध्दांत गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सर्वपक्षानी याआंदोलनास पाठींबा दिला. पोलीस प्रशासनाच्या वतीने आंदोलना वेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# नदी जोड प्रकल्पाकरिता केंद्राने मदत करावी

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याकरिता राज्य सरकारने सुरु केलेल्या नदीजोड प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी केंद्र सरकारने अर्थसहाय्य करावे अशी विनंती राज्याच्या वतीने केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर पाटील यांच्याकडे करण्यात आली.

राज्यातील सिंचन प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर पाटील यांच्या उपस्थितीत विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री गिरीष महाजन, जलशक्ती विभागाचे केंद्रीय सचिव कांताराव, आयुक्त प्रविण कुमार, विभागाचे अपर मुख्य सचिव दिपक कपूर, सचिव डॉ.संजय बेलसरे यांच्यासह राज्याच्या सर्व पाटबंधारे महामंडळाचे कार्यकारी संचालक आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यामध्ये सुरु असलेल्या सिंचन प्रकल्पांच्या कामाची माहिती केंद्रीय मंत्र्यांना देण्यात आली. सुरु असलेल्या कामाबाबत त्यांनी समाधानही व्यक्त केले. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत राज्यातील २९ प्रकल्पांचा समावेश करण्यात आला असून, यामध्ये कोकण पाटबंधारे विकास महामंडळअंतर्गत ५, विदर्भ पाटबंधारे महामंडळा अंतर्गत ७, कृष्णा खोरे विकास महामंडळ अंतर्गत ९ आणि गोदावरी विकास महामंडळ अंतर्गत ४ तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत ४ प्रकल्पांची कामे सुरु असल्याचे केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. यापैकी कृष्णा व गोदावरी प्रकल्पाअंतर्गत सुरु असलेल्या १३ प्रकल्पांपैकी दहा प्रकल्प पूर्ण झाले असल्याची माहिती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत दिली. बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत कृष्णा व गोदावरी महामंडळाच्या अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांच्या कामापैकी १५ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. उर्वरित दोन प्रकल्प पूर्ण करण्याकरिता विभागाचे प्रयत्न असून, या दोन्हीही योजनांच्या अंतर्गत सुरु असलेल्या कामांची गती वाढवून ही कामे पूर्णत्वास जाण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही केंद्रीय मंत्री सी.आर पाटील यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात नदीजोड प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये प्राधान्याने दमणगंगा-एकदरे-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, कोकण गोदावरी खोरे, नळगंगा- वैनगंगा, पार गोदावरी या प्रकल्पांच्या कामासाठी अधिकच्या निधीची गरज असून, केंद्र सरकारने यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि गिरीष महाजन यांनी बैठकी दरम्यान केली.

# वडिलांच्या निधनाचे दुःख पचेना; २१ वर्षीय मुलाचीही विहिरीत आढळली बॉडी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, नाशिक :** प्रतिनिधी पितृछत्र हरपल्याचे दुःख डोंगराएवढे असते, पण ते दुःख पचवण्याची शक्ती मिळण्यापूर्वीच एका विशीतील तरुणाने जगाचा निरोप घेतल्याची काळीज पिळवटून टाकणारी घटना नाशिकमध्ये घडली आहे. सिडको परिसरातील २१ वर्षीय शुभम बाळासाहेब व्यापारी या तरुणाचा मृतदेह हांडे मळा येथील एका विहिरीत तरंगताना आढळल्याने संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

**वडिलांच्या अपघाती निधनानंतर शुभम होता तणावात...**

मिळालेल्या माहितीनुसार, शुभमचे वडील बाळासाहेब व्यापारी यांचा काही दिवसांपूर्वीच भीषण अपघातात मृत्यू झाला होता. घराचा आधारवड गेल्याने व्यापारी कुटुंब पूर्णपणे कोलमडून पडले होते. वडिलांच्या जाण्याने शुभम प्रचंड मानसिक धक्क्यात आणि तणावात होता. याच नैराश्यातून त्याने टोकाचे



पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.

**बेपत्ता शुभमचा शोध विहिरीत संपला...**

वडिलांच्या निधनानंतर अवघ्या काही दिवसांतच शुभम घरातून बेपत्ता झाला होता. कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला, नातेवाईकांकडे विचारणा केली, मात्र त्याचा कुठेही पत्ता लागला नाही. अशातच १९ जानेवारी रोजी हांडे मळा परिसरातील एका विहिरीत एका तरुणाचा मृतदेह तरंगताना स्थानिकांना दिसला. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मृतदेह बाहेर काढला आणि ओळख पटवली असता, तो बेपत्ता शुभम व्यापारी असल्याचे निष्पन्न झाले.

**घातपात की आत्महत्या? पोलिसांचा तपास सुरू**

शुभमचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत अद्याप गूढ कायम आहे. वडिलांच्या निधनाचा धक्का सहन न झाल्याने त्याने आत्महत्या केली की यामागे अन्य काही कारण आहे, याचा तपास अंबड पोलीस करत आहेत. पोलिसांनी या प्रकरणी तूर्तास 'अकस्मात मृत्यू'ची नोंद केली आहे.

**व्यापारी कुटुंबावर दुःखाचा डोंगर**

एकाच महिन्यात बाप आणि लेकाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने व्यापारी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अवघ्या २१ वर्षांच्या तरुणाने अशा प्रकारे जगाचा निरोप घेतल्याने सिडको परिसरात शोककळा पसरली असून, हळहळ व्यक्त होत आहे.

# श्री गजाननाच्या जन्मामागील व्यापक दृष्टिकोन

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**



भाद्रपद मासातील गणेश चतुर्थीच्या दिवशी श्री गणेशाची मातीची मूर्ती घरी आणून तिची घरामध्ये प्राणप्रतिष्ठा करतात. दीड, तीन, पाच, सात किंवा दहा दिवस बाप्पाची सकाळी आणि सायंकाळी पूजा-आरती करून बाप्पाला प्रतिदिन वेगवेगळ्या पक्वान्नांचा नैवेद्य दाखवला जातो. सप्तमीला श्री गणेशाची माता पार्वती म्हणजेच गौरीचे आगमन होते. अष्टमीला गौरीपूजन केल्यानंतर नवमीला गौरीसोबत श्रीगणेशालाही निरोप दिला जातो. लहानांपासून वयोवृद्धांपर्यन्त सर्वांचाच लाडका असलेल्या बाप्पाच्या या सणाला पौराणिक कथेचा आधार आहे. गेल्या काही वर्षांपासून माघ महिन्यातील विनायक चतुर्थीला म्हणजेच गणेश जयंतीच्या दिवशीही काही जण श्रीगणेशाची मूर्ती घरी आणून तिचे पूजन करू लागले आहे. काही ठिकाणी तर माघ महिन्यातही गणेशोत्सव सार्वजनिकरित्या साजरे होऊ लागले आहेत. ही संख्या वर्षागणिक वाढत आहेत. श्रीगणेश जयंतीच्या दिवशी श्री गणेश मूर्ती घरी आणण्यामागे कोणतीही कथा किंवा शास्त्र यांचा आधार नसला, तरी मनुष्य मुळातच उत्सवप्रिय प्राणी असल्याने त्याला उत्सव साजरे करण्यासाठी केवळ एखादे निमित्त पुरेसे असते. माघी गणेश जयंतीनिमित्त घरी बसवले जाणारे गणपती याचाच भाग आहे.

श्री गणेश लहरी ज्या दिवशी प्रथम पृथ्वीवर आल्या, म्हणजेच ज्या दिवशी श्री गणेशाचा जन्म झाला, तो दिवस होता माघ शुद्ध चतुर्थी. तेव्हापासून गणपतीचा आणि चतुर्थीचा संबंध जोडला गेला. माघ शुद्ध चतुर्थी ही 'श्री गणेश जयंती' म्हणून साजरी केली जाते. या तिथीचे वैशिष्ट्य म्हणजे, या तिथीला श्री गणेशाचे तत्त्व हे नेहमीच्या तुलनेत १ हजार पटीने कार्यरत असते. श्रीगणेशाच्या जन्माची कथा सर्वांनाच ठाऊक आहे. माता पार्वतीने स्नानासाठी जाताना शरीराच्या मळापासून बाळ तयार केले आणि सिद्धीद्वारे त्यामध्ये प्राण टाकले. या बाळाच्या हाती तिने दंड दिला आणि आईचे स्नान होईपर्यंत कुणालाही आत सोडू नकोस, असे बजावून ती स्नानासाठी गेली. जेव्हा भगवान शिव कैलासावर आले तेव्हा ते माता पार्वतीच्या कक्षात जाण्यासाठी निघाले. त्याच क्षणी गणेशाने त्यांना अडवले. शिवांनी त्यांना आपली ओळख सांगूनही मातेची आज्ञा कुणालाही आत न पाठवण्याची असल्याने त्याने शिवांना आत सोडले नाही. शिव आपल्या स्थानावर गेले आणि त्यांनी नंदी सह गणांना गणेशाची समजूत काढण्यासाठी गणेशाकडे पाठवले; मात्र गणेशाने या सर्वांनाच मार देऊन पिटाळले. गणेशाच्या या कृतीने क्रोधीत झालेल्या शिवांनी अखेर त्रिशूल सोडून गणेशाचे शीर धडावेगळे केले. ही बातमी माता पार्वतींना कळताच त्यांनी रौद्ररूप धारण केले. त्यांना शांत नाही केले तर पृथ्वीचा विनाश होंणार हे निश्चित होते.

गणांसह देवादिकांनी त्यांची समजूत काढल्यावर त्या शांत झाल्या; मात्र श्री गणेशाला पुनर्जीवित करण्याची अट त्यांनी घातली. यानुसार शिवांनी इंद्रासह देवांना जंगलात उत्तर दिशेला पाठवले आणि सर्वप्रथम जो प्राणी दिसेल त्याचे शीर आणण्यास सांगितले. पुष्कळ शोध घेतल्यानंतर त्यांना एक हत्ती दृष्टीस पडतो. हा हत्ती म्हणजे गजासुर होता ज्याने शिवाची प्रचंड उपासना करून त्यांना प्रसन्न केले होते. शिव कायमस्वरूपी आपल्या सोबत राहावेत अशी त्याची इच्छा होती. भगवान शिवांना श्री गणेशासाठी शीर हवे आहे कळले तेव्हा त्याने देवादिकांना आपले शीर घेण्याची विनंती केली. गजासुर हा महाज्ञानी होता. श्री गणेशाच्या माध्यमातून त्याला सदैव शिवांजवळ राहता येणार असल्याने तो आनंदी होता. गजासुरचे शीर गणेशाला लावण्यात आले. शिवांनी देहाला जिवंत केले आणि गजाननाचा जन्म झाला. कोणत्याही कार्यात श्रीगणेशाचे सर्वप्रथम पूजन केले जाईल असा शिवांनी गणेशाला वर दिला. पार्वतीने तयार केलेला गणेश महापराक्रमी होता; मात्र त्याच्यातील शक्तीला सात्त्विकतेची म्हणजेच शिवाची जोड नसल्याने त्यामध्ये अहंकारही तेव्हढ्याच प्रमाणात होता. त्यामुळे गणेशातील सामर्थ्य भविष्यात विनाशकारी ठरू शकते याची जाण शिवांना होती. माता पार्वतीने गणेशाची निर्मिती करताना गणेशाने केवळ आपली आज्ञा पाळावी असा सूक्ष्म स्वार्थी विचारही यामागे दडलेला होता. एखाद्या कलाकृतीमागे थोडा जरी स्वार्थ दडलेला असेल तर ती कलाकृती सात्त्विकतेपासून दूर जाते. त्यामुळे मातेचे आज्ञापालन करताना गणेशाने सारासार विवेकाच्या मर्यादा ओलांडल्या होत्या.

करुणा, दया, क्षमा यांचे भानही त्याला उरले नव्हते. आदिशक्तीच्या मळापासून बनलेल्या गणेशाची शक्ती अफाट होती; परंतु बुद्धी मात्र मलिन, रज आणि तम गुणांनी युक्त होती. वास्तविक हा पार्वतीनंदन विश्वाच्या कल्याणासाठी, ते मंगलमय करण्यासाठी आणि विश्वात आनंद पसरवण्यासाठी अवतीर्ण झाला होता; परंतु 'अशी मलिन बुद्धी जगाचे कल्याण नव्हे, तर अकल्याणच करणार', हे त्रिकालज्ञानी शिवाने अगोदरच जाणले होते. आपल्या सामर्थ्याच्या अहंकाराने जेष्ठ-कनिष्ठ भेद न पाहता सर्वांवर अन्याय करणार्या पुत्रामुळे जगाचे भवितव्य अंधकारमय होऊ नये, यासाठी त्याची मलिन बुद्धी जाणे आवश्यकच होते आणि ती घालवण्यासाठीच मलिन बुद्धी असलेले त्याचे शिर धडावेगळे करण्याचा निर्णय शिवांना घ्यावा लागला. धन्य ते पिता, जे जगत्कल्याणासाठी पुत्राचे शिर धडावेगळे करण्यासही मागे पुढे पाहत नाहीत.

**(आधार : सनातन डॉट ऑर्ग)**

# क्रिप्टोचे चलन-वलन !



क्रिप्टो चलन हा विषय गेल्या दशकात केवळ तंत्रसजग वर्तुळांमध्ये औत्सुक्याचा न राहता मुख्य प्रवाहातील माध्यमांमध्ये सावधपणे चर्चा घडवून आणण्याचा आणि सर्वसामान्य नागरिकांमध्येही कुतुहलाचा झाला आहे. क्रिप्टो हे डिजिटल किंवा आभासी चलन आहे. अमेरिका, जपान, जर्मनी यांसारख्या प्रगत देशांत त्याला कायदेशीर मान्यता आहे. अमेरिकेसारख्या देशात गुंतवणुकीचे माध्यम म्हणून त्याकडे पाहिले जाते, तर एल साल्वादोरसारख्या मध्य आफ्रिकी देशात चक्क दैनंदिन व्यवहारातील चलन म्हणून ते वापरले जाते. त्याचे व्यवहार वास्तवात होत असले तरी त्यात प्रत्यक्ष छापील चलनाची देवघेव न होता ब्लॉकचेन या तंत्रज्ञानातून ती होते. या देवघेवीचे सूत्रधारही त्या-त्या देशांतील मध्यवर्ती बँका नव्हे, तर या ब्लॉकचेनच्या विकेंद्रित जाळ्यातून खासगीरीत्या केले जाते.

सन २००८मध्ये अमेरिकेतील वित्तीय संस्था गहाणवटीच्या संकटात अडकल्या आणि संपूर्ण जगावर मंदीचे सावट पसरले. त्या पार्श्वभूमीवर २००९मध्ये 'बिटकॉइन'चा जन्म झाला. 'सातोशी नाकामोटो' नामक त्याचा जन्मदाता. त्याने स्वतःचे अस्तित्व आजवर कधीच उघड न केल्याने ही कोणी व्यक्ती आहे की त्यांचा समूह, हेदेखील उघड झालेले नाही. परंतु कोणत्याही देशांची सरकारे किंवा मध्यवर्ती बँका यांच्या नियंत्रणापलीकडे ठेवणाऱ्या चलनाचा त्यातून जन्म झाला. त्यासाठी ब्लॉकचेन हे तंत्रज्ञान वापरले गेले. थोडक्यात म्हणजे डिजिटल खतावणी, ज्याचे जाळे जगभर पसरलेले असेल. त्यात कोठेही, कोणीही केलेल्या व्यवहारांची मिटवता न येणारी नोंद होईल आणि ती सर्व ठिकाणी पाहता येईल.

बिटकॉइननंतर आता रिपल, डॉजकॉइन, कार्डानो, बिनान्स कॉइन अशीही क्रिप्टो चलने व्यवहारात आली आहेत. या सर्व डिजिटल चलनांचा व्यवहारांत वापर होण्याला त्यांची दोन वैशिष्ट्ये कारणीभूत ठरत आहेत. एक म्हणजे त्यांचे विकेंद्रित स्वरूप व पारदर्शकता, ज्यामुळे त्यांचा गैरवापर रोखणे व त्यांचा वापर करून गैरव्यवहार केले जाण्याला पायबंद घालणे शक्य होते आणि बाजारपेठेपलीकडील नियमनांत त्यांना जखडणे अशक्य ठरते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे क्रिप्टोकडे आज जगभर केवळ चलन म्हणून नव्हे, तर गुंतवणुकीचे माध्यम म्हणूनही पाहिले जाते. नगण्य मूल्यापासून सुरुवात होऊन हजारो डॉलरचे विनिमय मूल्य त्यास प्राप्त झाले आहे. करोनानंतर २५ लाख रुपयांच्या घरात असणाऱ्या एका बिटकॉइनचे विनिमय मूल्य आज ८३ लाख रुपयांपलीकडे पोचले आहे! त्यामुळे गुंतवणूकदारांसाठी संधींचे हे नवे दार खुले झाले आहे.

क्रिप्टो चलनांकडे पाहण्याचे वेगवेगळ्या देशांचे दृष्टिकोन वेगवेगळे राहिले आहेत. काही देशांनी त्याचे नावीन्य, गुंतवणुकीची संधी किंवा आर्थिक समायोजनाचा मार्ग म्हणून ते स्वीकारले आहे; तर काही देशांनी त्यावर थेट निर्बंध किंवा बंदीच घातली आहे. काही देशांत आपल्या चलनाच्याच डिजिटल रूपाचा पर्याय म्हणून विचार केला जात आहे. भारतानेही डिजिटल रुपयाचा मार्ग अनुसरला असून, रोख रकमेची विश्वासार्हता आणि डिजिटल चलनाची सुलभता यांचा संगम साधला आहे.

भारतात क्रिप्टो चलनाच्या व्यवहारांवर ना अधिकृतरीत्या बंदी आहे, ना त्याचा चलन म्हणून स्वीकार करण्यात आला आहे. सध्याच्या प्राप्तिकर कायद्यात त्याचा उल्लेख 'आभासी डिजिटल मालमत्ता' (व्हर्च्युअल डिजिटल ॲसेट – व्हीडीए) म्हणून करण्यात आला आहे. भारतीय कायद्यानुसार, कोणतीही वस्तू किंवा सेवा खरेदी करण्यासाठी क्रिप्टो चलन वापरता येत नसले, तरी नोंदणीकृत विनिमय केंद्रांद्वारे क्रिप्टो चलनांची खरेदी-विक्री, त्यांचे व्यवहार करणे किंवा ती बाळगणे यांसाठी भारतीय नागरिकांना मुभा दिलेली आहे. त्यासाठी या विनिमय केंद्रांना ग्राहकांची पूर्ण माहितीची (केवायसी) नोंद ठेवण्याचे आणि काळा पैसा पांढरा करण्यास प्रतिबंध करणाऱ्या (अँटी मनी लाँडरिंग) नियमांचे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या चलनाच्या व्यवहारांतून मिळणाऱ्या प्राप्तीवर सरकारने ३० टक्के कर लावला आहे. त्यांच्या हस्तांतर व्यवहारावर एक टक्का उद्गम करही (टीडीएस) आकारला जात आहे. क्रिप्टोकडे सरकार मालमत्ता म्हणून पाहते, हे या करांचे स्वरूपच स्पष्ट करते. गेल्या तीन आर्थिक वर्षांत देशातील क्रिप्टो विनिमय केंद्रांनी यातून ११०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवल्याची माहिती केंद्र सरकारने महिनाभरापूर्वीच लोकसभेमध्ये सादर केली आहे. या व्यवहारांतही महाराष्ट्र आघाडीवर असून, क्रिप्टो व्यवहारांवरील उद्गम कर कपातीपैकी ६० टक्के रक्कम ही महाराष्ट्रातून वसूल करण्यात आली आहे. क्रिप्टो विनिमय केंद्र म्हणून भारतात काम करण्यासाठी केवायसी आणि मनी लाँडरिंग नियमावलींच्या चौकटींबरोबरच वित्तीय गुप्तवार्ता विभागाकडे नोंदणी अनिवार्य ठेवण्यात आली आहे. आता त्यात खाते उघडणाऱ्या ग्राहकांसाठी प्रत्यक्ष उपस्थितीची खातरजमा करण्यासाठी 'लाइव्ह सेल्फी' फोटो काढण्याची आणि ग्राहकाच्या जिओ-टॅगिंगची व्यवस्थाही नव्याने करण्यात आली आहे. निनावी खाती उघडली जाऊ नयेत आणि ग्राहक व त्यांच्या व्यवहारांची सुरक्षितता सुनिश्चित व्हावी, हा उद्देश यामागे आहे.

# स्मृतींचे राजकारण : शासन निर्णयातून वगळले गेलेले राष्ट्रपुरुष आणि अस्वस्थ करणारे वास्तव



लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून ती सामूहिक स्मृती, मूल्ये आणि परंपरा यांवर उभी असते. एखादा समाज कोणाला स्मरतो, कोणाला विसरतो आणि कोणाला जाणीवपूर्वक बाजूला सारतो, यावर त्या समाजाची वैचारिक दिशा ठरते. याच पार्श्वभूमीवर २०२६ मध्ये राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांच्या जयंती-पुण्यतिथी व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत काढण्यात आलेल्या शासन निर्णयातून जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती-पुण्यतिथी वगळल्या गेल्याची बाब केवळ प्रशासकीय नव्हे, तर गंभीर वैचारिक प्रश्न उपस्थित करणारी ठरते. हा निर्णय चुकून झाला आहे का? की तो एका ठराविक विचारसरणीचा सूचक आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीत योगदान देणाऱ्या नेत्यांना वगळणे हे कुठल्या भारताची कल्पना मांडते?

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज हे केवळ धार्मिक संत नव्हते; ते सामाजिक क्रांतिकारक व महाराष्ट्राच्या आत्म्याचे शिल्पकार होते. त्यांनी समाजाला भक्तीच्या नावाखाली पलायनवाद शिकवला नाही, तर समतेचा, विवेकाचा आणि मानवतेचा मार्ग दाखवला. ज्ञानेश्वरांनी अवघ्या तरुण वयात लिहिलेली ज्ञानेश्वरी ही ग्रंथरचना संस्कृतच्या मक्तेदारीला आव्हान देत मराठीला ज्ञानभाषा बनवणारी ठरली. विश्वचि माझे घर ही भूमिका मांडणारा हा संत आजही समावेशक भारताची संकल्पना सांगतो. संत तुकाराम महाराजांनी अभंगातून अन्याय, दांभिकता आणि सामाजिक विषमतेवर प्रहार केला. जाति कुळ धर्म नाही उरला असे सांगणाऱ्या तुकारामांचे विचार आजही समाजातील भिंती तोडणारे आहेत. अशा संतांना शासन निर्णयातून वगळणे म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मुळांनाच दुय्यम ठरवण्यासारखे आहे. महाराष्ट्राची संतपरंपरा ही कर्मकांडप्रधान नव्हे, तर मानवकेंद्रित परंपरा आहे. संतपरंपरा म्हणजे श्रद्धा नव्हे, तर सामाजिक संविधान आहे. इथे देवापेक्षा माणूस महत्त्वाचा ठरतो. त्यामुळेच फुले-शाहू-आंबेडकर यांनी संतपरंपरेला सामाजिक परिवर्तनाचा पाया मानला. अशा परंपरेतील दोन प्रमुख स्तंभ, ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांची जयंती-पुण्यतिथी शासनाच्या अधिकृत यादीतून वगळली जाणे म्हणजे समतेच्या विचारधारेला बाजूला सारण्याचा संकेत आहे का, असा प्रश्न निर्माण होतो.

दुसरीकडे, माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी वगळली जाणेही तितकेच चिंताजनक आहे. राजीव गांधी हे कोणत्याही पक्षापुरते मर्यादित नेते नव्हते; ते आधुनिक भारताच्या तंत्रज्ञानात्मक आणि प्रशासकीय सुधारणांचे शिल्पकार होते. पंचायतराज व्यवस्था, १८ वर्षांवरील मताधिकार, संगणकीकरण, दूरसंचार क्रांती, तरुणांना राजकारणात संधी, या सगळ्या गोष्टींनी भारताला २१व्या शतकात प्रवेश करण्यासाठी तयार केले. आज डिजिटल इंडियाची भाषा बोलताना, त्याचे मूळ रोवणाऱ्या नेतृत्वाला विसरणे हा इतिहासाशी केलेला अन्याय ठरतो. कोणत्या व्यक्तींच्या जयंती-पुण्यतिथी शासनस्तरावर साजऱ्या करायच्या, हा निर्णय केवळ प्रशासकीय सोयीचा नसतो. तो राज्याच्या वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब असतो. त्यामुळेच हा निर्णय तांत्रिक म्हणून दुर्लक्षित करता येत नाही. जर संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीतील नेत्यांना वगळले जात असेल, तर मग कोणत्या मूल्यांना प्राधान्य दिले जात आहे? हा प्रश्न उभा राहतो. शासन हे सर्वसमावेशक असते की निवडक स्मृतींवर उभे राहते, याची चाचणी अशाच निर्णयांतून होते.



**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**

इतिहास हा केवळ पुस्तकांत नसतो; तो स्मरणोत्सवांत, सार्वजनिक कार्यक्रमांत आणि सामूहिक साजरीकरणात जिवंत राहतो. ज्या क्षणी शासन पातळीवर एखाद्या व्यक्तीचे स्मरण थांबते, त्या क्षणी हळूहळू तिचे विचारही बाजूला पडण्याचा धोका निर्माण होतो. संत तुकाराम-ज्ञानेश्वर किंवा राजीव गांधी यांना वगळणे म्हणजे फक्त नावांची कपात नव्हे, तर विचारांची कपात आहे. महाराष्ट्र म्हणजे केवळ भौगोलिक राज्य नव्हे; तो संत-समता-सुधारणांचा प्रदेश आहे. जर याच परंपरेला शासन निर्णयातून दुय्यम स्थान दिले गेले, तर उद्या फुले, शाहू, आंबेडकर यांच्याबाबतही असेच होणार नाही, याची खात्री कोण देणार? हा प्रश्न भावनिक नसून राज्याच्या आत्म्याशी संबंधित आहे.

२०२६ च्या शासन निर्णयाने एक स्पष्ट गरज अधोरेखित केली आहे, इतिहास, संस्कृती आणि राष्ट्रनिर्मिती यांचा समतोल राखणारे निर्णय घेण्याची. कोणालाही वगळून, कुणाला प्राधान्य देऊन समाज एकसंध राहत नाही. संतपरंपरा आणि आधुनिक नेतृत्व हे विरोधी नाहीत; ते एकाच भारतीय प्रवासाचे वेगवेगळे टप्पे आहेत. त्यांना वेगळे करण्याचा प्रयत्न म्हणजे भारताच्या समावेशक आत्म्यालाच धक्का देणे होय. शासनाने हा निर्णय पुनर्विचारात घ्यावा, ही केवळ मागणी नाही; ती लोकशाहीची अपेक्षा आहे. कारण राष्ट्र उभे राहते ते केवळ भविष्यातील स्वप्नांवर नाही, तर जपलेल्या स्मृतींवर. महाराष्ट्राची ओळख ही केवळ सत्तेच्या निर्णयांनी घडलेली नाही; ती संतांच्या अभंगांनी, विचारवंतांच्या लेखणीतून आणि राष्ट्रउभारणीत योगदान देणाऱ्या नेत्यांच्या दूरदृष्टीतून घडलेली आहे. त्या स्मृती जपणे ही कोणाची मक्तेदारी नाही, तर शासनाची घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे.

जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी शासन निर्णयातून वगळणे हा केवळ प्रशासकीय बदल नसून, सामूहिक स्मृती पुसण्याचा धोकादायक प्रयत्न ठरू शकतो. आज जर हे स्वीकारले, तर उद्या कोणाचे नाव यादीतून गळेल याची शाश्वती कोण देणार? शासनाने तात्काळ या निर्णयाचा पुनर्विचार करावा. स्मरणोत्सव ही औपचारिकता नाही; ती पिढ्यांना मूल्यांची ओळख करून देणारी शाळा असते. संतांचा विवेक, समाजसुधारकांचा मानवतावाद आणि आधुनिक राष्ट्रनिर्मात्यांची दूरदृष्टी, या तिन्ही प्रवाहांशिवाय महाराष्ट्र अपूर्ण आहे. आज गरज आहे ती विभाजनाच्या नव्हे, तर समावेशनाच्या निर्णयांची. सत्तेच्या बदलत्या समीकरणांपेक्षा समाजाच्या दीर्घकालीन आत्म्याला प्राधान्य देण्याची. कारण स्मृती जपणारेच राष्ट्र घडवतात आणि स्मृती पुसणारे इतिहासाच्या कठड्यावर उभे राहतात. शासनाने हे लक्षात ठेवावे की, संत, राष्ट्रपुरुष आणि विचारवंत यांना वगळून नव्हे, तर त्यांना सन्मान देऊनच लोकशाही मजबूत होते.

## गुंतवणूका

नवी विकास गंगा
गुंतवणूकी आणा
बळ देणारं राज्या
महत्व सत्व जाणा

विरोध नको फुका
बदले जरा धारणा
गरज आहे सर्वांस
लवचिकताधोरणा

बोलणी सुफळ हो
जरुर तितके ताणा
उद्योगव्यापार मोठे
अर्थव्यवस्था कणा

विचारसकारात्मक
प्रयास ना पडे उणा
काही विरोध ठरले
करत राही ठणाणा

अडसर जागोजागी
पाय आपटे दणाणा
विपरीत परिणाम रे
भेसूर रूप रणांगणा

पाखरे तिकडे येती
जिकडे पाणी दाणा
फायदा पाही सगळे
आणा पालखीमेणा

फायदा स्वराज्याचा
कधीकधी हो म्हणा
सामील महोत्सवांत
हो गुंतवणूकी सणा

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## दिव्यात समस्यांचा डोंगर तरीही एकहाती सत्ताधाऱ्यांचा विजय

### दिवा शहरातील निकाल अनाकलनीय - ज्योती पाटील



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, दिवा (ठाणे) :** दिवा मतमोजणीच्या दिवशी निकाल लागायच्या आधी दुपारीच दिवा शहरातील सर्व उमेदवार विजयी झाले असे घोषित करण्यात आले याचा अर्थ सत्ताधाऱ्यांना निकाल माहित होता का ? दिव्यात इतक्या भरघोस मतांनी सत्ताधारी निवडून येत असतील तर दिव्यात काहीच समस्या नाहीत असं म्हणायचं का ? मतमोजणीच्या दिवशी ३ ईव्हीएमची सील ओपन होते असं सांगून सुद्धा त्याकडे लक्ष दिलं गेलं नाही यामागे कारण काय ? असे सवाल करत शिवसेना ठाकरे गटाच्या दिवा शहर संघटिका ज्योती पाटील यांनी या वेळचा निकाल अनाकलनीय असल्याचे म्हटले आहे.दिवा शहरात ठाणे महानगरपालिकेचा निकाल ज्या पद्धतीने लागला आहे, ते पाहता या ठिकाणी दिवा शहरातील नागरिकांना कोणत्या समस्या भेडसावत नाहीत, असा याचा अर्थ काढायचा का? असा सवाल ज्योती पाटील यांनी उपस्थित केला आहे. याशिवाय अनेक लोक सांगतात की, आम्ही विरोधी पक्षाला मतदान केलं आहे. मग ती मतं गेली कुठे? हाही प्रश्न ज्योती पाटील यांनी उपस्थित केला आहे. दिवा शहरातील निवडणूक विकासाच्या मुद्यांवर झालीच नाही, ती जर विकासाच्या मुद्यांवर झाली असती तर एक हाती सत्ता सत्ताधाऱ्यांना मिळाली नसती, असा दावाही ज्योती पाटील यांनी केला आहे. पैशांचा वापर, यंत्रणेचा वापर वापर करून मिळवलेला हा विजय आहे, असेही ज्योती पाटील यांनी म्हटले आहे. आपल्याला जनतेने ईव्हीएम मधून जी मत दिली आहेत, त्या जनतेसाठी मी ठामपणे पुढील काळात उभी राहणार, असा विश्वासही ज्योती पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## गुहागर तालुक्यातील सुप्रसिद्ध असोरे नमन पुन्हा रंगभूमीवर




**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२०, मुंबई :** गेली चार दशकं नमन लोककला अविरत जोपासत रसिक मनावर अधिराज्य गाजविले असे गुहागर तालुक्यातील सुप्रसिद्ध असोरे नमन मंडळ येत्या रविवार दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ वा. साहित्य संघ मंदिर, गिरगाव (मुंबई) येथे नमन लोककलेतील विविध पैलूना स्पर्श करत खेळ्यांचा पारंपरिक साज बाज जोपासत रंगभूमीवर येत असून सोबत भक्तिमय गण, स्त्री पात्राने नटलेली गौळण आणि गेली तीन दशक रसिकाना भावलेली कै. शांताराम घडशी लिखित सत्यवान सावित्री ही वग नाट्यकृती रसिकाना पुन्हा पाहता येणार आहे. सदर नाट्यकृतीला दिग्दर्शन दिपक वेलुंडे सह रवींद्र डिंगणकर, वैभव गोंधळी यांचे लाभले आहे. जवळ जवळ ४० कलाकारांच्या ताफ्यात सादरीकरण होणारा या मोसमातील शुभारंभ प्रयोगाकडे अवघ्या कोकण कलाविश्वाचे लक्ष लागून राहिले आहे.

### सामाजिक दायित्व विभागाचा उपक्रम प्रेरणादायी - संविअ धनंजय साळवे

## बाल सखिंना शालेय साहित्य वितरण




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, विसापूर (चंद्रपूर) :** सामाजिक जीवनात वंचित घटकांचा स्तर उंचावणे गरजेचे आहे. सामाजिक दायित्व विभाग ही जबाबदारी योग्य बजावतो. खऱ्या अर्थाने शिक्षण क्षेत्रातील हा उपक्रम योग्य दिशा देणारा आहे. अप्रगत मुलांना प्रगत करण्याची जबाबदारी गौरवास्पद आहे. बिल्ट उद्योग समूहाच्या सामाजिक दायित्व विभागाचा विसापूर येथील उपक्रम प्रेरणादायी ठरणारा आहे, असे प्रतिपादन बल्लारपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी धनंजय साळवे यांनी केले.

बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात बिल्ट ग्राफिक पेपर प्रा.लि. व पहेल मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने ६ ते १४ वयोगटातील अप्रगत मुलांना प्रगत करण्याच्या अनुषंगाने बाल सखींची नियुक्ती करण्यात आली. त्यांना शालेय साहित्य वितरण कार्यक्रम मंगळवार, दि.२० जानेवारी २०२६ ला घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बिल्ट चे अधिकारी महेश दबा होते.

प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी धनंजय साळवे, बिल्टचे अधिकारी सुनील गोंतलवार, माजी जि.प.सदस्य रामभाऊ टोंगे, विसापूरचे उपसरपंच अनेकश्वर म श्राम, विसापूरचे केंद्र प्रमुख नागेंद्र कुमरे, सुनिल नाकाडे, मधुकर भोयर, मुख्याध्यापक नरेंद्र वनकर, जि.प.हायस्कूलचे मुख्याध्यापक अरविंद चौधरी, ग्रामपंचायत अधिकारी गणेश कोकोडे, मुख्याध्यापिका नंदूरकर , नामदेव शेडमाके यांची उपस्थिती होती.यावेळी मान्यवरांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उदघाटन केले. दरम्यान येथे नियुक्त दहा बाल सखींना मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक भाषणातून पहेल मल्टीपर्पज सोसायटीच्या संचालक मंजुषा काकडे यांनी कार्यक्रमाची भूमिका विषद केली. संचालन सुभम पारवे यांनी केले. आभार दिनेश भोयर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बाल सखी ऊषा पुंडे, विद्या झाडे, शितल कुक्कावार, वंशिका गिरसावळे, कल्याणी मुंजेकर, दीक्षा कोरेवार, सेजल गिरडकर, मधुशा शेडम ाके, नेहा खोंडे, काजल मोरे यांनी सहकार्य केले. यावेळी विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.

## महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस - मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२०, मुंबई :** भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्र गेटवे-ऑफ-इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणूकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत. राज्य शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, आयटी- आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही- ऑटोम ोबाईल, जहाज बांधणी, डीजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकांकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधी मंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरू केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरू झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले.

तत्पुर्वी, दावोस मधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून म हाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे, अशी भावना ही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी व करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणूकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी म हाराष्ट्र सदैव सज्ज आहे. येथे होणाऱ्या करारांवरील पुढील कार्यवाहीबाबत वॉर रूमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल.

'उद्योजक – गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता, यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विशेषतः मुंबईतील घनकचरा व्यवस्थापन, हवा आणि पाणी गुण संनियत्रणाच्या माध्यमातून सर्क्युलर ईकॉनॉम ीची संरचना उभी केली जात आहे. तसेच महाराष्ट्र हे अमर्याद संधीचे राज्य आहे. त्याबाबत आणि एमएमआर क्षेत्राच्या विकासासह, तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीने आराखडा निश्चित करून दिला आहे. या माध्यमातून व्यवसायाच्या रोगजार निर्मितीवर भर दिला जात असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

दरम्यान, आगामी दोन दिवसात दावोसमध्ये एआय, क्वांटम कंप्युटींग, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, यांसह फिनटेक, लॉजिस्टिक्स अँड इन्फ्रास्ट्रक्चर तसेच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणुकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, चर्चेच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार गतवर्षी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष (MAITRI) या गुंतवणूक आणि उद्योग सुलभतेला प्रोत्साहन देणाऱ्या समर्पित संस्थात्मक व्यवस्थेमुळे यंदा गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्राचा महाराष्ट्राकडील ओघ आणखी वाढला आहे.

### सामंजस्य करार पुढीलप्रमाणे -

महाराष्ट्र सरकार–काल्सबर्ग; क्षेत्र: अन्न प्रक्रिया आणि कृषी; गुंतवणूक: ५०० कोटी; रोजगार : ७५०.

महाराष्ट्र सरकार– योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि.; क्षेत्र: नविनिकरणीय ऊर्जा; गुंतवणूक: ४ हजार कोटी; रोजगार : ६ हजार; ठिकाण: पालघर/एमएमआर.

महाराष्ट्र सरकार–बीएफएन फॉर्जिंग्स; क्षेत्र: स्टील; गुंतवणूक: ५६५ कोटीरोजगार : ८४७; ठिकाण: पालघर/एमएमआर.

एमएमआरडीए – सुमिटोमो रियालिटी; गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स; रोजगार : ८० हजार.

एमएमआरडीए- के.रहेजा; गुंतवणूक: सुमारे १० बिलियन डॉलर्स; रोजगार : एक लाख.

एमएमआरडीए–अल्टा कॅपिटल/पंचशील; गुंतवणूक: सुमारे २५ बिलियन डॉलर्स; रोजगार : २ लाख ५० हजार.

एमएमआरडीए–एसबीजी समूह; क्षेत्र: लॉजिस्टिक्स; गुंतवणूक: सुमारे २० बिलियन डॉलर्स; रोजगार : ४ लाख ५० हजार.

एमएमआरडीए–आयआयएसएम ग्लोबल; गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स; रोजगार : ८० हजार.

एमएमआरडीए–जायका; धोरण आणि स्ट्रॅटेजी पार्टनर

एमएमआरडीए – सेम्बकॉर्प डेवलपमेंट लि. सिंगापूर; एकीकृत इंडस्ट्रियल पार्कसाठी नॉलेज पार्टनर

एमएमआरडीए – टेक्निकल युनिव्हर्सिटी, मुनीच, जर्मनी; शाश्वत नागरी वाहतूक प्रणाली

महाराष्ट्र सरकार–सुरजागड इस्पात; क्षेत्र: स्टील; गुंतवणूक: २० हजार कोटी; रोजगार: ८ हजार.; ठिकाण: गडचिरोली.

महाराष्ट्र सरकार–लोढा डेव्हलपर्स; क्षेत्र: आयटी, डेटा सेंटर्स; गुंतवणूक: १ लाख कोटी; रोजगार: १ लाख ५० हजार.

ज्यांनी महाराष्ट्रात आणखी गुंतवणूक आणि विस्तार करण्याची तयारी दर्शवली असे: कोकाकोला, आयकिया, स्कोडा ऑटो. याशिवाय, कार्लसबर्गचे सीईओ जेकब अँडरसन यांनी महाराष्ट्रातील गुंतवणूकीला पोषक वातावरणाचे कौतुक करताना राज्याच्या उद्योग धोरणाला दाद दिली.

कंपनी लवकरच भांडवली बाजारात आयपीओ आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कोका-कोला कंपनीचे सीनिअर व्हाईस प्रेसिडेंट मायकेल गोल्टझमन यांच्या समेवत देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी गुंतवणुकीच्या अनुषंगाने चर्चा झाली.

## सातारा जिल्हा परिषद व महाबळेश्वर पंचायत समिती निवडणूक नामनिर्देशन पत्र दाखल



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२०, महाबळेश्वर (सातारा) :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व शिवसेना (शिंदे गट) यांच्या उमेदवारांनी वाजत गाजत शक्ती प्रदर्शन करीत आज विविध गट व गणांसाठी खालीलप्रमाणे उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केली आहेत.

जि. प. तळदेव गट
१. अजित रामचंद्र संकपाळ – शिवसेना
२. रेणुका अजित संकपाळ – अपक्ष
३. संजय रामचंद्र गायकवाड – नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी

जि. प. भिलार गट
आज या गटासाठी एकही नामनिर्देशन पत्र दाखल झालेले नाही.

गणनिहाय माहिती खालिल प्रमाणे

६७ कुंभरोशी गण
१. सचिन श्रीरंग उतेकर – नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी
२. संजय हरिश्चंद्र मोरे – शिवसेना

६८ तळदेव गण
१. संजय विठ्ठल शेलार – शिवसेना
२. गोविंद देवजी संकपाळ – अपक्ष
३. अभिषेक आत्माराम शिंदे – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)

६९ मेटगुताड गण
१. शकुंतला रमेश चोरमले – नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी

७० भिलार गण
१. पूनम निलेश गोळे – अपक्ष
२. सविता रामचंद्र गोळे – नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी
३. वंदना प्रवीण भिलारे – नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी

## राजकर्त्यांनी एकामेकांची जिरवत बसण्यापेक्षा मुंबई जागतिक दर्जाचे शहर म्हणून कसे विकसित होईल.. हे पहावे...?

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी.**
**कागल-कोल्हापूर**

केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेमध्ये भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षांचे ट्रिपल इंजिन सरकार आलेले आहे, त्यामुळे आता मुंबईचे शांघाय होणार की सिंगापूर होणार, असे लोकांनाही वाटू लागले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या प्रचारसभांमधून लोकांना असे आवाहन करतात की, जेव्हा डबल इंजिन सरकार असते म्हणजे केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असते तेव्हा विकासाचा वेग डबल होतो. म्हणजे राज्याचा वेगाने विकास होतो. आता महाराष्ट्रात २४ महानगरपालिकांमध्ये भाजपची सत्ता आलेले आहे. त्यामुळे भाजपचे ट्रिपल इंजिन सरकार आलेले आहे. त्यामुळे आता विकासाचा वेग तिप्पट असणे अपेक्षित आहे. त्यात मुख्य म्हणजे मुंबई महानगरपालिकेची सत्ता मिळवणे हे भाजपचे स्वप्न होते. ते पूर्ण झालेले आहे. त्यांना एकनाथ शिंदे यांची सोबत आहे. पण शिंदे यांना हाताळणे उद्धव ठाकरे यांना हाताळण्याइतके अवघड नाही, याची भाजपला कल्पना आहे, त्यामुळे ते खूश आहेत. मुंबई महानगरपालिकेसारख्या आर्थिकदृष्ट्या शक्तीशाली महापालिकेची सत्ता मिळाल्यानंतर आता भाजपची खरी कसोटी लागणार आहे. कारण आता भाजप काय करते, याकडे सगळ्यांचे लक्ष असणार आहे. जर त्यांनी फारसे काही केले नाही तर त्यांचे हसे होईल. पण मुंबईचा विकास करताना मुंबई केंद्राच्या ताब्यात जाणार नाही, याची काळजीही भाजपच्या राज्यातील नेत्यांना घ्यावी लागेल.

नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यावर चीन आणि जपान यांच्या राष्ट्रप्रमुखांना भारतात निमंत्रित करून त्यांच्या देशातील विकसित शहरांची जोडणी भारतातील काही शहरांशी केली होती. सिस्टर सिटी अग्रीमेंट अंतर्गत भारतातील शहरांचाही तसाच विकास करायचा, असे त्यामागील धोरण होते. पण त्याबाबतीत पुढे काही हालचाल झाली नाही. आता तो विषयही निघत नाही. मोदींनी देशभरात स्मार्ट सिटी बनवण्याची योजना जाहीर केली, पण त्याम ाध्यमातून किती सिटी स्मार्ट झाल्या त्याचाही काही पत्ता नाही. जेव्हा आपल्या देशातील नेते मंडळी भारतापासून जवळच असलेल्या चीन किंवा सिंगापूरचे दौरे करून येतात तेव्हा त्यांना तिथली भुरळ पडते. इथे आल्यावर ते म्हणू लागतात, सत्ता आमच्या हाती द्या, आम्ही मुंबईचे शांघाय बनवू, सिंगापूर बनवू. भाजपच्या हाती आता ट्रिपल इंजिनची सत्ता आलेली आहे. त्यामुळे मुंबई शहराचा कायापालट त्यांनी करावा अशी अपेक्षा आहे. मुंबईत एकापेक्षा एक उंच टॉवर बनत आहेत, पण त्याच टॉवर्सच्या जवळपास आणि जवळच्या डोंगरांवर मोठ्या प्रमाणात बैठी वस्ती आणि झोपडपट्टी वाढत आहे. मुंबईमध्ये नशीब काढण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातूनच नव्हे तर बांगलादेश, नेपाळमधील लोक मुंबईत येतात, त्यामुळे मुंबईची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे या शहराच्या पायाभूत सुविधांवर मोठा ताण पडत आहे. नोकरी व्यवसायासाठी लोकांना प्रवास करावा लागतो. त्यासाठी प्रामुख्याने लोक लोकल रेल्वेचा उपयोग करतात. कारण लोकांना कमी वाहतूक कोंडी आणि कमी खर्चाचा हा प्रवास पडतो, त्यामुळे लोकांची त्याला जास्त पसंती असते. परिणामी लोकलमध्ये प्रवाशांचा श्वास कोंडून टाकणारी आणि हाडे खिळखिळी करणारी गर्दी असते. गर्दी कमी करण्यासाठी जमि नीपासून उंचावरून जाणारी मेट्रो आणि जमिनीच्या खालून जाणारी भुयारी मेट्रो सुरू करण्यात आलेल्या आहे. त्यांच्या विस्ताराचे काम सुरू आहे. हे स्वागतार्ह असले तरी मुंबईतील वाहतूक व्यवस्थेचे मोठे आव्हान मुंबईच्या कारभाऱ्यांकडे असणार आहे.

मुंबईत जर सगळ्यात पहिले मोठे कुठले आव्हान असेल ते म्हणजे मुंबईतील अस्वच्छता. कारण जितकी मोठी लोकसंख्या आणि जितके अनेक मोठे उद्योगधंदे तितके कचरा निर्माण होण्याची प्रमाण मोठे असते. जेव्हा इतक्या मोठ्या प्रमाणात कचरा तयार होतो, तेव्हा त्याचा खरे तर कल्पकतेने वीज निर्मितीसाठी उपयोग करायला हवा. त्यामुळे कचऱ्याची विल्हेवाटही लागेल आणि मुंबईसारख्या मोठ्या शहराला वीजही उपलब्ध होईल. इतकेच नव्हे तर मुंबईतून वाहणारी मिठी नदी स्वच्छ करण्यासाठी २००५ सालापासून काही हजार कोटी रुपये खर्च झाले असतील, पण त्या नदीची काही स्वच्छता झालेली नाही, तर मग हा पैसा कुठे आणि कसा खर्च झाला, हे कळायला मार्ग नाही. मुंबईत मोठ्या प्रमाणात नालेसफाईची कामे निघत असतात, रस्ते उभारणीची कामे निघत असतात, यांच्या कंत्राटांमध्ये मोठा भ्रष्टाचार होतो. पावसाळ्यात पाणी तुंबण्याची समस्या असते. विकासकामांमध्ये टक्केवारी ही मोठी बाधक गोष्ट असते. टक्केवारी विकास प्रकल्पांच्या दर्जेदारपणाला लागलेली किड आहे. त्यामुळे विकास प्रकल्प कमजोर होत असतात. मुंबई हे जागतिक दर्जाचे शहर बनवायचे असेल तर नव्या सत्ताधाऱ्यांना टक्केवारी बंद करावी लागेल. शहरामधील स्वच्छता कोटेकोरपणे करावी लागेल. कारण विदेशातून फिरून भारतात आल्यावर पहिल्यांदा लोकांच्या तोंडून शब्द निघातात ते म्हणजे काय ती त्यांच्याकडची स्वच्छता, अगदी चणे शेंगदाणे हातून रस्त्यावर पडले तरी उचलून घ्यावेत. त्यामुळे आता ट्रिपल इंजिन सरकारने यात लक्ष घालून स्वच्छतेसाठी यंत्रणा सज्ज करण्याची गरज आहे. केवळ लोकांना स्वच्छतेचे आवाहन करून, स्वच्छता कर्मचाऱ्यांबरोबर फोटो काढून, स्वच्छता राखण्यासाठी प्रसारम ाध्यमांवर जाहिराती करून शहरात स्वच्छता राखली जाणार नाही. राजकीय पक्षांनीदेखील एकामेकांची जिरवत बसण्यापेक्षा मुंबई हे एक जागतिक दर्जाचे शहर म्हणून कसे विकसित होईल, यासाठी प्रयत्न करायला हवेत. कारण शांघाय आणि सिंगापूर बनण्यासाठी तिथल्या सत्ताधाऱ्यांचे मोठे योगदान आहे, हे लक्षात घ्यावे लागेल...!!

# पेण तालुक्यात चौथ्या दिवसाअखेर जिल्हा परिषद गटांसाठी ६ उमेदवारी अर्ज दाखल

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२०, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समिति निवडणूक जाहिर होऊन उम दवारी अर्ज भरण्याच्या चौथ्या दिवशी जिल्हा परिषदेच्या वडखळ, शिहू, रावे या तीन मतदारसंघातून मंगळवार, दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी शिवसेनेच्या पल्लवी प्रसाद भोईर आणि समीर म्हात्रे, शेकापचे संजय जांभळे, भाजपचे वैकुंठ पाटील आणि मिलिंद पाटील तसेच पल्लवी प्रसाद भोईर अपक्ष असे एकुण सहा उमेदवारी अर्ज दाखल झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील हे सर्व प्रस्थापित उम दवार असून या तीनही जिल्हा परिषद म तदार संघात आज उमेदवारी अर्ज सादर केल्यानंतर पेण प्रांत कार्यालयात आज मोठ्या प्रमाणात उमेदवार व समर्थकांची रेलचेल दिसून आली. दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी उमेदवारी अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिवस असून



नेमकं चित्र दिनांक २१ जानेवारो २०२६ रोजी स्पष्ट होणार आहे. युती आघाडीचे संकेत मिळतात का हे राजकीय पक्षाचे समिकरण उद्या स्पष्ट होणार का याबाबत राजकीय पक्ष पदाधिकारी काहिच बोलत नव्हते.पण राष्ट्रवादी अजीत पवार गटाचे माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी आज भाजप नेते रविशेट पाटील यांचे निवासस्थानी भेट दिली आहे.

आज एका दिवसात ३० उमेदवारानी ५५कोरे नामनिर्देशन पत्र देण्यात आले असल्याचे प्रांत अधिकारी प्रविण पवार यांनी सांगितले तर दि.१६ जानेवारी ते २०जानेवारी या चार दिवसात तब्बल १९३ नामनिर्देशन पत्र देण्यात आले आहेत. उद्या हा आकडा वाढण्याची शक्यता असून जिल्हा परिषदेच्या पाच तर पंचायत समिति निर्वाचन गणातील दहा जागांसाठी ही नामनिर्देशन पत्र देण्यात आल्याचे पवार यांनी सांगितले.

२२ दादर जिल्हा परिषद गटात भाजपचे रायगड जिल्हा महामंत्री आम दार पुत्र वैकुंठ रविंद्र पाटील याचा आज एकमेव अर्ज दाखल झाला आहे

२३, वडखळ गटात शिवसेनेकडून दोन वेळा निवडून आलेल्या संजय जनार्दन जांभळे यांनी

शेतकरी कामगार पक्षाकडून तर मि लिंद मोरेश्वर पाटील यांनी भाजपाकडून तर समीर सुभाष म्हात्रे यांनी शिवसेना उबाठा पक्षाकडून उमेदवारी अर्ज भरला आहे.या जि.प. गटात भाजपा शेकाप, शिवसेना उबाठा अशी तिरंगी हाय होल्टेज चुरशीची निवडणूक होणार असल्याचे आज उमेदवारी अर्जावरून दिसून आले.

दिनांक २१ जानेवारी यात विद्यमान विजेते उमेदवार यांचा उमेदवारी अर्ज भरल्यानंतर वडखळ जि.प. मतदार संघ शेकाप आपली विजयी परंपरा कायम ठेवण्यासाठी संजय जांभळे यांच्यासारखा तगडा उमेदवार निवडणूक रिंगणात उभा केला आहे.

२५ शिहू जिल्हा परिषद गटात. शिवसेना उबाठा पक्षाच्या पल्लवी प्रसाद भोईर यांनी पक्षांतर्फे एक व अपक्ष असे दोन उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकारी प्रवीण पवार यांच्याकडे एकुण ६ उमेदवारी अर्ज आज निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर केले आहेत.

# थोडक्यात

## नक्की नोकर कोण; शासन, प्रशासन का जनता ?

**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.२०, नेरूळ (नवी मुंबई) :** प्रशासन व शासन हे जनतेच्या हितासाठी असतात हे सत्य जनता पुर्णपणे विसरून गेलेली आहे. याच कारणामुळे प्रशासन व शासन मिळून सर्रासपणे हुकूमशाही पध्दतीने वागत आहे. व आपण सर्व याच शांत व घाबरलेल्या अवस्थेत असलेल्या जनतेचे प्रतिनिधी म्हणून प्रशासनात काम करतोय. आज १७ दिवसापासून सर्व वाहनांचे पासिंग बंद असून आपण काही प्रतिनिधी वारंवार ही गोष्ट प्रशासनाला प्रत्येक भेटून सोशल मिडियातून, प्रिंट मीडियातून लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करतोय. परंतु या प्रशासनावर व शासनावर बसलेले निर्भीड लोक या गोष्टीकडे बिनदास्त दुर्लक्ष करत आहेत. याला कारण एकच आपल्या सर्वांचा नाकर्ते पणा हाच आहे. यासाठी एकजुटीने आवाज उठवण्याची गरज आहे. स्वतंत्र भारताच्या लढ्यात इंग्रजांना हद्दपार करण्यासाठी शेवटी एकजूटच कामी आली, हा इतिहास आहे. प्रशासन व शासन हे जनतेचे नोकर आहेत. याची जाणीव त्यांना करून देणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा या अशा अनेक अन्यायापासून आपणास साक्षात देव ही वाचवू शकणार नाही.

## भानेगावचे सुपुत्र देवेंद्र ठाकरे गुरुजींना 'राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.२०, नागपूर :** शिक्षक हा समाजाचा कणा असून भावी पिढी घडविण्याचे पवित्र कार्य ते करत असतात. याच ब्रीदवाक्याला जागून आपल्या अष्टपैलू कार्याने शिक्षण क्षेत्रात ठसा उमटवणारे भानेगावचे सुपुत्र देवेंद्र ठाकरे यांना यंदाचा प्रतिष्ठित 'राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी मुंबई येथील आरंभ हॉलमध्ये बी. दि चेंज फाऊंडेशन'च्या वतीने आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात हा गौरव करण्यात आला.

देशातील विविध राज्यांतील गुणी आणि कर्तव्यनिष्ठ शिक्षकांचा गौरव करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक अधिकारी अरुण भंडारे, प्रसिद्ध अभिनेत्री निवेदिता पगार, अमृत रोहोम तसेच फाऊंडेशनचे अध्यक्ष मयूर ढोकचौळे आणि विश्वस्त अभिषेक तुपे आदी मान्यवर उपस्थित होते. देवेंद्र ठाकरे यांनी शिक्षण क्षेत्रात केवळ अध्यापनाचे काम न करता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. एक आदर्श पिढी घडवण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान आणि त्यांचे सामाजिक कार्य विचारात घेऊन त्यांना या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र आणि पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

## आमदार मेहता यांनी मिरा भाईंदर जनतेचे आभार व्यक्त केले

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**




**दि.२०, मिरा भाईंदर :** मंगळवार, दिनांक २० जानेवारी २०२६ दुपारी १ वा. बीजेपी कार्यालय येथे प्रेस कॉन्फरेन्समध्ये आमदार नरेंद्र मेहता यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यावर जोरदार हमला केला. म्हेता म्हणाले की, सरनाईक यांनी आपला पराभव मान्य करावा आणि मिरा भाईंदरच्या जनतेने आम्हाला स्वीकारले आहे, हे लक्षात ठेवावे. ७८ नगरसेवक आमचे निवडून आले आहेत. महाराष्ट्र राज्यात आम्ही पाहिल्या क्रमांकावर आलो आहोत.आम्ही आमच्या वचननाम्यात जे बोललो ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार आणि ते पूर्ण करूच, असा आत्मविश्वास मेहता यांनी व्यक्त केला.मेहता यांनी सरनाईक यांना काही सवालही केले, जसे की भाईंदर पश्चिम ला एसटी डेपो, सनटेक बिल्डरकडून ३०० बेडचे हॉस्पिटल, आणि घोडबंदर रस्ता विस्ताराचे काम पूर्ण करून दाखवावीत. महानगरपालिका ही स्वायत्त बॉडी असल्याचे सांगत, मेहता म्हणाले की, विकासासाठी महापौरची सहमती लागेल, त्यांनी आपल्या अख्यारातील कामे करावीत आणि आम्हाला आमची कामे करू द्यावी.

# स्काउट गाईडच्या लाभ व सवलती पासून लाखों विद्यार्थी वंचित

## महासंघाची दोषी मुख्याध्यापकांवर कार्यवाहीची मागणी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२०, नागपूर :** शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या अधिनस्थ असलेल्या व शालेय, शासकीय सहित आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम असलेल्या स्काऊट आणि गाईड या अभ्यासक्रमाकडें जिल्ह्यातील काही शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी जानिवपूर्वक दुर्लक्ष केल्याम ळे राज्यातील लाखो शालेय विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. अश्या दोषी मुख्याध्यापक व शिक्षकांवर शिस्तभंगाची कार्यवाही करून सेवेतून बडतर्फ करण्याची माहिती अधिकार कार्यकर्ता म हासंघाचे राज्य कार्याध्यक्ष शेखर कोलते यांनी शासन व प्रशासनाकडे लेखी तक्रार सहित मागणी केली आहे.

सुरुवातीला शाळेत स्काऊट गाईड हा विषय पर्यायी विषय म्हणून होता. मग शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने सन २०२३ पासून हा विषय राज्यातील सर्वच बोर्डच्या शाळांना सक्तीचा व अनिवार्य करण्यात आला. सोबतच जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगरपालिकेच्या शासकीय शाळां व खाजगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना शाळेकडूनच दरवर्षी एक स्काऊट गाईडचा गणवेश देण्याचे आदेशित केले आहे यासाठी शाळेला शासनाकडून निधी सुद्धा दिला जातो

**अनेक लाभ व सवलती**

१) राज्य पुरस्कार, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आणि आंतरराष्ट्रीय जांबोरीम ध्ये सहभागी विद्यार्थ्यांना दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षामध्ये तीन व दहा अशे अतिरिक्त गुण मिळतात,

२) राष्ट्रीय पर्व समारोहमध्ये अश्या पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचा पालकमंत्री, मुख्यमंत्री, राज्यपाल व राष्ट्रपती यांच्या हस्ते सत्कार

३) राज्य शासन व केंद्र शासनाच्या नौकरी भर्ती मध्ये आरक्षण - व प्राथमिक ता विशेष कोटा भर्ती

४) सैन्य दल, पोलिस विभाग, अग्निवीर, सुरक्षा विभाग, रेल्वे विभाग सहित अन्य विभागात स्काऊट गाईडची विशेष कोटा भर्ती राबविली जाते

५) रेल्वे प्रवास व राज्य परिवहनच्या बस मध्ये प्रवास साठी सवलत

६) जिल्हा स्तरावर आदर्श शिक्षक पुरस्कार व बेस्ट स्काउट बेस्ट गाईडर पुरस्कार

७) प्रधानमंत्री स्पर्धा व लक्ष्मी मजूम दार ढाल स्पर्धा मध्ये सहभागी शाळां व संस्थेचा जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर सन्मान

८) 'मुख्यमंत्री माझी शाळा' या योजनेत सहभागी शाळांना मूल्यम पनाच्या वेळी अतिरिक्त गुण.

शिक्षकांना वर्षातून दोनदा प्रशिक्षणमहाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड्स, राज्य कार्यालय अंतर्गत राज्यातील सर्वच शाळेच्या शिक्षकांना मोजक्या शुल्कामध्ये पाच दिवसांचे भोर (पूर्ण), रामटेक (नागपुर), कोल्हापुर व मुंबई अश्या राज्य प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण दिले जाते. सोबतच उच्च प्रशिक्षणाची संधी सुद्धा उपलब्ध करून दिली जाते, हे शासकीय प्रशिक्षण असल्यामुळे त्या शिक्षकांना पगारी सुट्टी दिली जाते, सोबतच या प्रमानपत्राची सेवा पुस्तकात नोंद करून उच्च श्रेणी बढती व वेतनवाढ अशे लाभ दिले जाते. परंतु शाळेत स्काऊट गाईड हा अभ्यासक्रम व विषय शिकविन्यासाठी अतिरिक्त वेतन दिले जात नसल्याने शिक्षकांद्वारे याला नापसंती व बोझा सम जला जातो आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आगावु पैसा खर्च करून स्थानिक ओपन युनिटमध्ये प्रशिक्षण घेण्यास बाध्य व्हावे लागते. सोबतच शाळेत बाहेरील प्रशिक्षित स्काऊट मास्टर व गाईड कैप्टन यांची नियुक्ति करून यांचा मासिक पगाराचा व वार्षिक नोंदनीचा बोझा सुद्धा याच विद्यार्थ्यांच्या शाळांशुल्कावर टाकला जातो आहे. शासनाचे आदेश व निर्णयाचे पालन केल्याचा देखावा करने साठी संपूर्ण शाळेतील मोजक्याच विद्यार्थ्यांची जिल्हा कार्यालयात वार्षिक नोंदणी केली जाते, हे अति विशेष .

मान्यता काढणे व बडतर्फ करण्याची मागणीशालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या अधीनस्थ असलेला स्काऊट गाईड हा अभ्यासक्रम व विषय राज्यातील प्रत्येक शाळेला बंधनकारक आहे. शिक्षणाचा मोफत व सक्तिचा अधिकार अधिनियम नुसार अश्या लाभदायक व बंधनकारक विषयाचे शिक्षण प्रशिक्षणा, लाभ व सवलती पासुन विद्यार्थ्यांना वंचित ठेवणे म्हणजे राज्य घटनेद्वारे प्राप्त शिक्षणाचा सवैधानिक अधिकारांचे हनन करने आहे. हे कृत्य असवैधानिक व आपराधिक असल्याने अश्या शाळांच्या स्काऊट गाईड विषयी रिकॉर्ड्सची चौकशी करून दोषी शाळांची मान्यता काढून मुख्याध्यापक, शिक्षक व शाळां संस्थावर फौजदारी कार्यवाहीसहित सेवेतून बडतर्फ करण्याची सख्त कार्यवाही करण्यात यावी, अशी कोलते यांनी मागणी केली आहे.

# श्री मतोबा महाराज यात्रोत्सवाची उत्साहात सांगता

## १५ दिवसांत सुमारे १० लाख भाविकांनी घेतले दर्शन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान व नैताळे ग्रामस्थांचे आराध्य दैवत श्री मतोबा महाराज यात्रोत्सवाची उत्साहात सांगता झाली आहे. यात्रोत्सव काळात पंधरा दिवसांत सुमारे १० लाख भाविकांनी घेतले दर्शन घेतले असल्याची माहिती देवस्थान ट्रस्टने दिली. यात्रोत्सव दि ३ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात सुरु झाला. नाशिक - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नैताळे येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही पौष पौर्णिमेनिमित्त श्री मतोबा महाराज यांचा यात्रोत्सव भरविण्यात आला. हा उत्सव अखंड पंधरा दिवस सुरू होता.

यात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी भागवताचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली शिंदे, सुनील जैन, भारती जैन तसेच दर्शन रांगेत उभे असलेले भाग्यवान भाविक प्रविण पाटील व अनिता पाटील यांच्या हस्ते श्री मतोबा महाराजांच्या नव्या चांदीच्या मूर्तीची महापूजा करण्यात आली. बोकडदरे येथील भारत माता आश्रमाचे महंत महामंडलेश्वर १०८ जनेश्वरानंदगिरीजी महाराज व रथाचे मानकरी मोहन खापरे यांच्या हस्ते रथ मिरवणुकीस प्रारंभ झाला. यावर्षी रथ मिरवणुकीस प्रारंभ करताना रथाला पहिली बैलजोडी जुंपण्याचा मान सिन्नर तालुक्यातील भाटवाडी येथील शेतकरी नंदकिशोर महात्मे यांना देण्यात आला होता. भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे यासाठी दर्शन रांगा व मंडपाची योग्य व्यवस्था करण्यात आली होती.

मंदिर परिसरात प्रसाद विक्रीसाठी व्यावसायिकांना जागा



उपलब्ध करून देण्यात आली होती. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. गर्दी नियंत्रणासाठी स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली होती. भाविकांसाठी पिण्याच्या शुद्ध पाण्याची तसेच नारळ फोडण्यासाठी यंत्रांची व्यवस्था करण्यात आली होती.

यात्रा कालावधीत दररोज सकाळी ६, दुपारी १२ व संध्याकाळी ७ वाजता संगीतबद्ध आरतीचे आयोजन करण्यात आले होते. यात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यातील अनेक नामवंत बँड पथकांनी यात्रोत्सवात सहभागी होत आपली वाद्यकला सादर केली. यात्रोत्सवात सर्व जीवनावश्यक वस्तूंची दुकाने थाटण्यात आली होती. लासलगाव बाजार समितीच्या माजी सभापती सुवर्णाताई जगताप यांच्या हस्ते श्री मतोबा महाराजांची महाआरती करून यात्रोत्सवाची सांगता करण्यात आली.

# पाटण जि.प. साठी ९ तर पं.स. गणासाठी ७ अर्ज दाखल



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२०, पाटण (सातारा) :** पाटण जिल्हा परिषद व पंचायत समिति निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या पाचव्या दिवशी जिल्हा परिषदेच्या ७ गटात ९ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले तर पंचायत समितीसाठी ७ अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी सोपान टोंम्पे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अनंत गुरव यांच्याकडे दाखल झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

तर जिल्हा परिषद व पंचायत समि तीसाठी एकूण - ३७५ अर्ज विक्री झाले असल्याचे सांगितले.अर्ज भरण्याच्या पाचव्या दिवशी गोकुळ तर्फ हेळवाक जिल्हा परिषद गट नं - ४७ साठी १) अशोक दगडू पाटील, २) सावळाराम यशवंत लाड यांनी अर्ज भरले, तारळे जि.प. गट नं- ४८ साठी १) स्वप्ना अभिजीत पाटील, २) सुरेखा तुषार पाटील यांनी अर्ज भरले, म्हावशी जि.प. गट नं- ४९ साठी १) भरत शंकर साळुंखे, २) जयदीप विष्णू जाधव यांनी अर्ज भरले, मल्हारपेठ जि.प. गट नं- ५० साठी १) प्रेरणा प्रकाश पवार, मारूल हवेली जि.प. गट नं- ५१ साठी १) योगिता संतोष गिरी, शूश गश मंद्रुळ कोळे जि.प. गट नं- ५२ साठी १) सुवर्णा अविनाश पाटील, काळगाव जि.प. गट नं- ५३ साठी - अर्ज दाखल नाहीपाटण पंचायत समिति साठी म्हावशी गण नं- ९७ साठी १) मंगेश रामचंद्र मोळावडे २) सचिन शंकर सलते मल्हारपेठ गण नं- ९९ साठी १) नीता संतोष यादव, मारुल हवेली गण नं- १०१ साठी १) प्रियांका विक्रमसिंह देसाई, २) सुजाता उमेश देसाई मंद्रुळ कोळे गण नं- १०४ साठी १) नितीन दत्तात्रय काळे, काळगाव गण नं- १०६ साठी १) आदित्य गणेश मोरे यांनी अर्ज दाखल केले आहेत. अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस बुधवार, दि.२१ जानेवारी २०२६ हा एकच दिवस आहे. यामुळे इच्छुक उमेदवारांच्या अर्जांची गर्दी शेवटच्या दिवशी पहायला मिळणार आहे.

**उमेदवारी अर्ज भरताना नियमांचा भंग**

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी अर्ज भरताना उमेदवारा बरोबर केवळ तीन असे एकूण चार जणांनाच निवडणूक कक्षात प्रवेश दिला जाणार असे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पत्रकार परिषदेत माध्यमांना सांगितले होते. मात्र प्रत्यक्षात उमेदवारांबरोबर पाच ते सहा उमेदवारांचे समर्थक निवडणूक कक्षात गेलेचे दिसून आले. या अतिउत्साही समर्थकांना वेळोवेळी अधिकारी सुचना देत होते. मात्र त्यांच्या सुचनांकडे उमेदवार समर्थकांनी दुर्लक्ष केले. या अतिउत्साही समर्थकांवर निवडणूक नियम भंगाची कारवाई होणार का..? असा प्रश्न निवडणूक नियमांचे पालन केलेल्या उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी उपस्थित केला.